(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९९६] ३ एस. सी. आर. ४९८

**सीथमल**

*- विरुद्ध -*

**सेंथिल फायनॅन्स आणि आणखी एक.**

१५ मार्च १९९६

[के. रामास्वामी आणि जी. टी. नानावटी, न्यायमूर्ती]

*दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८: आदेश २१-नियम ९७.*

*हुकूमनाम्याची अंलबजावणी - लिलाव विक्री साठी - न्यायनिर्णित ऋणको द्वारे लिलाव विक्रीस दिलेले आव्हान अंमलबजावणी न्यायालयाद्वारे रद्द करण्यात आले - उच्च न्यायालयाची पुष्टी - अपील - रु. ४०,०००/- ची मालमत्ता उत्तरवाडीकडे गहाण - मालमत्तेचे मूळ मूल्य रु. ७५,०००/- परंतु नंतर ते रु. ५०,०००/- इतके कमी करण्यात आले होते रु. १५,०००/- ची उत्तरवादीची बोली गहाण ठेवीची रक्कम भरण्याच्या अधीन राहून स्वीकारन्यात आली - मालमत्ता खरेदी करण्यासाठी कोणीही पुढे येत नाही - उत्तरवादी - स्वतः गहाण ठेवणारा रु. १५,१००/- साठी खरेदी करतो - अंलबजावणी न्यायालयाने केलेली विक्री बेकायदेशीर ठरवली - न्यायनिर्णित ऋणकोने जमा केलेली हुकूमनाम्याची संपूर्ण रक्कम डिक्री धारकाने आधीच काढून घेतली - न्यायनिर्णित ऋणकोने विक्रीच्या तारखेपासून तर रु. १५,००० जमा करण्याच्या तारखेपर्यंत १८ टक्के व्याजसह आणि रु.२,०००/- पाउंड शुल्कासाठी जमा करण्याचे निर्देश दिले.*

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्र. ५०९२/१९९६.

सी. आर. पी. क्र. १८९५/१९९३ मधील मद्रास उच्च न्यायालयाने दि. २६/०९/१९९५ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यासाठी आर. सुंदरवर्धन, सी. बालसुब्रमण्यम आणि के. रामकुमार.

उत्तरवादींसाठी ए. टी. एम. संपत आणि टी. श्रीनिवासधरन.

न्यायालयाचा न्यायनिर्णय पुढीलप्रमाणे देण्यात आला :

अनुज्ञा मंजूर झाली.

आम्ही दोन्ही बाजूंच्या विद्वान अधिवक्तांचे म्हणणे ऐकले.

ओ. एस. क्र. ६७/८७ मधील मनी डिक्रीच्या अंमलबजावणीत, इमारत असलेली १०५३ चौरस फूट जमीन, रु. १५,१००/- एवढ्या किंमतीला, गहाण ठेवीची रु. ४०,०००/- एवढी त्या मालत्तेवरील बोझ्याची रक्कम भरण्याच्या अधीन राहून विकण्यात आली. अपीलकर्ता/न्यायनिर्णित - ऋणकोने दि. प्र. सं. चा आदेश २१, नियम ९७, खाली विक्रीच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मद्रास उच्च न्यायालयाच्या दि. २६ सप्टेंबर १९९३ रोजीच्या आक्षेपित आदेशाद्वारे सी. आर. पी. क्र. १८९५/९३ मध्ये पुष्टी करण्यात आलेली ती दरखास्त न्यायालयाने फेटाळली. त्यामुळे हि अपील करण्यात आली .

दोन्ही बाजूंचा विद्वान अधिवक्तांचे म्हणणे ऐकल्यानंतर, आम्हाला असे वाटते की विक्री अंमलबजावणीपेक्षा अधिक आहे. याबद्दल वाद नाही कि विकल्या गेलेल्या मालमत्तेत १०५३ चौ. फु. च्या भागामध्ये बांधलेले घर आहे. या मालमत्तेचे मूळ मूल्य रु.७५,००० होते. पण त्यानंतर ती कमी करून रु.५०,००० झाली. एका लिलावात ते केवळ रु. १५,०००/- ला विकन्यात आले. हातची किंमत रु. १५,०००/- होती. उत्तरवादीची बोली रु. १५,१००/- होती आणि , जी गहाण ठेवीची रक्कम रु. ४०,०००/- भरण्याच्या अधीन राहून आधी सांगितल्याप्रमाणे विक्री बंद करण्यात आली. आता दुसऱ्या उत्तरवादीचे विद्वान अधिवक्ता श्री. ए. टी. एम. संपत यांनी सांगितले आहे की उत्तरवादी स्वतः त्या मालमत्तेचे रु.४०,०००/- एवढ्या रक्क्मेकारिता गहाणधारक आहे. त्यामुळे हे स्पष्ट आहे की मालमत्ता खरेदी करण्यासाठी कोणीही पुढे येत नव्हते आणि प्रतिवादीने स्वतः ती रु. १५,१००/- एवढ्या किमतीला खरेदी केली. या परिस्थितीत, आमचे असे मत आहे की अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाने केलेली डी विक्री स्पष्टपणे बेकायदेशीर होती. असे म्हटले जाते की अपीलकर्त्याने आधीच हुकूमनाम्याची संपूर्ण रक्कम जमा केली होती आणि डिक्रीधारकानेही ती काढून घेतली होती. याव्यतिरिक्त, अपीलकर्त्याला विक्रीच्या तारखेपासून म्हणजे २० जानेवारी १९९२ पासून उत्तरवादीने रु. १५,१००/- जमा केल्याच्या तारखेपर्यंत १८ टक्के दराने व्याज जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत आणि उत्तरवादीला ते काढून घेण्याचे स्वातंत्र्य असेल.याव्यतिरिक्त, अपीलकर्त्याने रु. २,०००/- एवढी रक्कम पाउंड शुल्कासाठी देखील भरावी. ही रक्कम आजपासून सहा महिन्यांच्या कालावधीत जमा केली जाईल.

त्यानुसार वरील अटींच्या अधीन राहून अपील अनुमत करण्यात आली आहे.

टी. एन. ए

अपिल अनुमत करण्यात आली.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल."